# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## लग्नाच्या वार्षिकोत्सव दिनी साजरा केल्या जाणा-या मिस्सेमध्ये विवाहित दाम्पंत्यांना द्यावयाचा आशीर्वाद विधी



*लग्नाच्या वार्षिकोत्सव दिनी, उदाहरणार्थ, रौप्यमहोत्सव, सुवर्णमहोत्सव, हीरक महोत्सव दिनी, लग्न साकामेंताची स्मृती विशेषरित्या जपणे उचित ठरेल. काही प्रसंगी म्हणजेच खाजगी मिस्सा असल्यास आणि सोहळा, सण वा बंधनकारक स्मृति नसल्यास रोमन मिस्साग्रंथामध्ये दिलेल्या लग्न वर्धापणादिनाची मिस्सा घेता येईल (रोमन मिस्सा ग्रंथ येथे पान क्रमांक ७६९..).*

प्रवचनानंतर

**धर्मगुरू** ः (नाव) आणि (नाव) लग्नाच्या साकामेंताद्वारे तुम्ही ज्या दिवशी परस्परांशी अतूट अशा प्रेमाच्या बंधनाने जोडले गेलात त्याचा ........ वा वर्धापन दिन (रौप्य महोत्सव / सुवर्ण महोत्सव / हीरक महोत्सव) आज आपण इथे साजरा करीत आहोत. त्यावेळी तुम्ही एकमेकांना परमेश्वरासमक्ष जी वचने दिली होती त्यांचे तुम्ही आज नूतनीकरण करू इच्छिता. ईश्वरी कृपेने वैवाहिक जीवनाचे हे बंधन दृढ व्हावे म्हणून प्रार्थनापूर्वक प्रभूकडे वळा.

*त्यानंतर पती-पत्नी शांतपणे आपल्या वचनांचे नूतनीकरण करतात. मात्र एकंदर परिस्थिती लक्षात घेता, पती-पत्नींना जाहीरपणे आपल्या वचनांचे नूतनीकरण करायचे असेल तर त्यासाठी इथे दिलेला नमुना वापरता येईल.*

**पती** ः हे परमेश्वरा, तू धन्य आहेस. तुझ्या चांगुलपणामुळे मी (नाव) हिला माझी पत्नी म्हणून स्वीकारले.

**पत्नी** ः हे परमेश्वरा, तू धन्य आहेस. तुझ्या चांगुलपणामुळे मी (नाव) ह्यांना माझा पती म्हणून स्वीकारले.

**दोघे एकत्र** ः हे परमेश्वरा, तू धन्य आहेस. आमच्या जीवनातील सुख दुःखाच्या प्रसंगी तू प्रेमाने आमच्या बाजूला उभा राहिलास. तू अखिल मानवजातीबरोबर जो करार केलेला आहेस त्याचे आम्ही मूर्तिमंत साक्षीदार बनावेत म्हणून आमच्या परस्परांवरील प्रेमात एकमेकांशी विश्वासू राहण्यास आम्हाला सहाय्य कर अशी आम्ही प्रार्थना करतो.

**धर्मगुरू** ः आयुष्याचे सर्व दिवस परमेश्वर तुम्हाला सुरक्षित ठेवो. संपन्नतेमध्ये तो तुम्हाला आधार देवो आणि अडी-अडचणीत तो तुमचे सांत्वन करो. तो तुमचे घर आशीर्वादाने व वरदानांनी भरून टाको. ही प्रार्थना आम्ही आपल्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. प्रतिसाद ः आमेन.

### अंगठयांना आशीर्वाद

*उचित असेल तर धर्मगुरू पुढील प्रार्थना म्हणतात.*

हे प्रभो, (नाव) आणि (नाव) ह्या तुझ्या सेवकांच्या परस्परांवरील प्रेमावर तुझा आशीर्वाद पाठव व त्यात वाढ कर. आपल्या प्रेमाची व एकनिष्ठतेची खूण म्हणून त्यांनी ह्या अंगठया एकमेकांना दिलेल्या होत्या. लग्न साकामेंताच्या कृपेत त्यांची सदैव वाढ होत राहो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. प्रतिसाद ः आमेन.

*अंगठयांना धूप देता येईल.*

*मात्र नवीन अंगठया सादर करण्यात आलेल्या असतील तर धर्मगुरू आशीर्वादाची पुढील प्रार्थना म्हणतात.*

हे प्रभो, ह्या तुझ्या सेवकांच्या परस्परांवरील प्रेमावर तुझा आशीर्वाद घाल व ते पवित्र कर. ह्या अंगठया त्यांच्या एकनिष्ठचे चिन्ह बनोत. त्याद्वारे त्यांना एकमेकांवरील प्रेमाचे आणि लग्न साकामेंतातील कृपेचे स्मरण होवो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. प्रतिसाद ः आमेन.

*त्यानंतर मिस्सेमधील विश्वासू लोकांच्या प्रार्थना म्हटल्या जातात किंवा खाली दिलेल्या प्रार्थना वापरता येतील.*

**धर्मगुरू** ः सर्वसमर्थ व दयावंत परमेश्वर बापाकडे आपण दयेची याचना करू या. त्यानेच वैवाहिक प्रीती व एकनिष्ठा ह्याद्वारे आपली तारणदायी योजना मानवाला प्रकट केली आहे.

**प्रतिसाद** ः हे प्रभो, तुझ्या सेवकांच्या निष्ठेचे नूतनीकरण कर.

१. हे पवित्र बापा, तू विश्वसनीय आहेस. आम्ही तुझा करार पाळावा अशी तुझी अपेक्षा असते. त्या करार पालनाचे पारितोषिक देखील तू आम्हाला देतोस. आपल्या वैवाहिक जीवनाचा (पंचविसावा, पन्नासावा,

साठावा) वर्धापन दिन साजरा करीत असलेल्या ह्या तुझ्या सेवकांना तुझ्या आशीर्वादाने भरून टाक. प्रतिसाद

२. हे पवित्र बापा, तू अनादिकाळापासून तुझा पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांच्यासमवेत परिपूर्ण आणि प्रेममय ऐक्याचा आस्वाद घेत असतोस. आपल्या लग्न साक्रामेंतामध्ये केलेल्या प्रेममय कराराची आठवण ह्या तुझ्या सेवकांनी सदैव ठेवावी आणि त्या करारास ते सर्वकाळ विश्वासू राहावेत म्हणून त्यांना कृपा दे. प्रतिसाद

३. हे पवित्र बापा, सर्व श्रद्धावंतांनी ख्रिस्ताच्या रहस्याचे वाटेकरी व्हावेत अशा रीतीने तू आपल्या दानशूरतेपोटी मानवी जीवनातील प्रत्येक अनुभवाची आखणी करीत असतोस. ह्या तुझ्या सेवकांनी सुखदुःखाचा धैर्याने स्वीकार करावा आणि ख्रिस्ताशी एकरूप होऊन केवळ त्याच्यासाठी जगण्याचा प्रयत्न करावा अशी कृपा कर. प्रतिसाद

४. हे पवित्र बापा, वैवाहिक जीवनातील सोबत ही ख्रिस्ती जीवनाचा आदर्श व्हावी अशी तुझी इच्छा आहे. सर्व विवाहित दाम्पत्यांनी या जगात तुझ्या पुत्राच्या प्रेम-रहस्याचे साक्षीदार बनावेत म्हणून त्यांना कृपा दे. प्रतिसाद

**धर्मगुरू ः** हे परमेश्वरा, तुझ्या प्रेमळ योजनेत तू कौटुंबिक जीवनाचा पाया घातलेला आहेस. तुझ्या सेवकांच्या प्रार्थना ऐकून घे. त्यांनी पवित्र कुटुंबाचा आदर्श डोळयांसमोर ठेवून शेवटी तुझ्या स्वर्गीय निवासस्थानी आनंदाने सदासर्वकाळ तुझा गौरव करावा असे वरदान त्यांना दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. प्र ः आमेन.

*खाली दिलेल्या प्रार्थनेव्यतिरिक्त मिस्सा नेहमीप्रमाणे पुढे सुरू राहते. अर्पणाच्या वेळी पती-पत्नी भाकर, द्राक्षारस व पाणी ह्यांचे अर्पण वेदीपाशी आणू शकतात.*

‘आमच्या स्वर्गीय बापा’ *या प्रार्थनेनंतर* ‘हे प्रभो सर्व वाइटांपासून आमचे संरक्षण कर’ *हा भाग वगळला जातो. धर्मगुरू पती-पत्नीच्या दिशेने हात विस्तारित म्हणतात ः*

हे परमेश्वरा, आम्ही तुझे स्तवन करतो. हे चराचर सृष्टीच्या निर्माणकर्त्या आम्ही तुला धन्यवाद देतो. प्रारंभी तू स्त्री-पुरूषाची निर्मिती केलीस. त्यांनी प्रेमाचे व ऐक्याचे जीवन जगावे अशी तुझी योजना होती. (नाव) आणि (नाव) ह्यांच्या कौटुंबिक जीवनाला तू आपल्या दयेने आशीर्वादित केलेस म्हणून आम्ही तुझे आभार मानतो. त्यांचे वैवाहिक जीवन हे ख्रिस्त व ख्रिस्तसभा ह्यांच्या ऐक्याचे प्रतीक बनो. त्यासाठी तू त्यांच्यावर आज दयादृष्टीने पाहा. सुखदुःखात, आजारात आणि आरोग्यात ते आता पर्यंत एकत्रितपणे जीवन जगत आलेले आहेत. प्रतिदिनी त्यांच्या लग्न-साक्रामेंतातील प्रेम कराराचे नूतनीकरण कर. त्यांच्यामधील प्रीतीभावनेत वाढ कर. त्यांच्यातील शांतीचे बंधन भक्कम कर म्हणजे ते (आपल्या मुलाबाळांच्या प्रेमळ भावारात) तुझ्या आशीर्वादाचा सदैव आस्वाद घेऊ शकतील. ही् प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. सर्व जण उत्तर देतात ः आमेन.

‘प्रभूची शांती तुम्हाबरोबर सदासर्वदा असो’ *असे म्हटल्यावर स्थानिक प्रथेला धरून असल्यास पती-पत्नी व इतर सर्व जण एकमेकांना शांती व प्रीतीभावना व्यक्त करणारे शांतीवंदन करतात.*

*पती-पत्नींना दोन्ही स्वरूपात ख्रिस्तशरीर देता येईल.*

*मिस्सेच्या शेवटी धर्मगुरू पती-पत्नीना व इतर उपस्थित लोकांना नेहमीप्रमाणे किंवा पुढील प्रमाणे भव्य आशीर्वाद देतात ः*

*डीकन पुढील शब्दात उपस्थितांना आशीर्वादासाठी आमंत्रण करतात ः*

आशीर्वादासाठी आपली मान नम्रतेने खाली वाकवा.

*त्यानंतर धर्मगुरू आपले दोन्ही हात पती-पत्नीवर आशीर्वादपुर्वक विस्तारून म्हणतात ः*

सर्वसमर्थ परमेश्वर पिता तुम्हाला आनंदाचे वरदान देवो. प्रतिसाद ः आमेन.

परमेश्वराचा एकुलता एक पुत्र सुखदुःखात मोठया करूणेने तुमच्या पाठीशी उभा राहो. प्रतिसाद ः आमेन.

पवित्र आत्मा नेहमीच तुमच्या अंतःकरणात त्याच्या प्रीतीचा वर्षाव करो. प्रतिसाद ः आमेन.

*शेवटी ते उपस्थितींना आशीर्वाद देतात.*

आणि सर्वसमर्थ परमेश्वर पिता, पुत्र + आणि पवित्र आत्मा इथे जमलेल्या तुम्हा सर्वांना आशीर्वाद देवो. प्र. आमेन.